Society is actually incomplete without a woman. Whenever girls are given opportunities, they have made everyone proud. There are many role models in our society such as Kalpana Chawla, Mary Kom, SainaNehwal, Sania mirza, Aren’t these all women? So “Give Girls, Their Chance”. Whenever they are provided with an opportunity, they shine like a star. We are also women, we are educated and young enough to bring about such changes in our society for all those girls who are devoid of their rights. In a nutshell, all I want to say is that we should also contribute to the girl’s education and to the country’s whole progress. If we determine something then, we can surely make it true.

**Palode Akshay Amrut**
**BCS T Y**

## Home Gardening of Medicinal Plants

India is the country of agriculture. From the ancient times our ancestors were doing the occupation. They were growing some plants which were used as home remedies along with their livelihood products such as food grain and fruits. Today life style is changed people in villages and major cities are doing home gardening which helps to create a healthier environment. Working in a home garden gives joy and passes good time. It is a great way to relieve stress. Following are some medicinal plants which can be grow in home garden.

Aloevera is used to keep our skin clear and hydrated. Its juice is an excellent way to keep our liver healthy. It helps to boost our immune system and it promotes hair growth.

Tulsi is a sacred plant and used for many medicinal and cultural purposes athome. The extract of its leaves is helpful in cold, fever, loss of appetite and lowersblood sugar level. The leaves strengthen the stomach and help in respiratory diseases. If we keep Tulsi root powder in water overnight and take it early in the morning, the medicinal property of the plant helps maintain insulin level in the bodyand is a natural cure for diabetes. It is helpful in cardiology along with reducing stress level. It can treat kidney stones and maintain dental health. Marigold is an annual plant and grows well under warm conditions.They are great ornamental plants.It is used traditionally for supporting healthy digestion, gastrointestinal function, and immune function. Its distinct fragrance boosts one’s mood and relieve stress. Snake plantis a succulent plant. It is capable of removing toxic pollutants from the surrounding, absorbing $CO_2$, and making air fresh. Snake plants help to filter indoor air and releases oxygen at night and is one of the top 10 air-purifying plants, according to NASA. This quality makes it an ideal plant for bedroom decor as it can help regulate healthy airflow. Money plant is the best ornamental plant that brings good luck to the beholder.It removes air pollutants inside the room. Many people in India think that it helps in warding off financial obstacles and brings good luck and prosperity in home. One of the biggest benefits of a money plant is that it can keep your mind calm and release your stress. Sadabahar is an ornamental plant with flowers, different species have different coloured flowers. Diabetes can be cured using this plant. Roseis the best ornamental plant with beautiful smelling flowers. It is used in making perfumes and skin care products. Corn Plant is the best air purifying houseplant.It increases concentration and sharpens focus. It increases humidity and it has great ornamental value. One of the astonishing feature of it that it absorbs Lead. Crown of Thornsis popular as a houseplant and is grown in warm climates as a garden shrub. The long thorns help keep animals and small children away, but accidental poisoning happens sometimes. The sap may produce a rash on susceptible individuals that is very similar to poison ivy. The sap in some species of the Crown of Thorns plant has been used for arrow poisons and to stupefy fish for capture.

**Mavare Ankita Motilal**
**B.Sc.S.Y.**

**Trust and Patience**

Trust yourself more when you have doubt on your skills, yourself and your destiny. Because, the simple five letter word has a great power to build a strong mind power to accept people and any kind of problems.

Patience is the only weapon which can heal any kind of bitter experiences, and build a bridge to overcome all the bad times. Be patient whenever you feel that something is wrong, because time heals everything.

Be calm and have Trust and Patience to accept any kind of situations in life because we never know what miracles can happen in the next second. Trust yourself every time before trusting anyone else, because no one knows you better than yourself. Only you can help yourself in all kinds of situations.

**Kakde Monali Manikrao**
**B Sc. S Y**

## इंद्रराज कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड

## राष्ट्रीय सेवा योजना

## सात दिवसीय विशेष शिबिर

दिनांक 21/03/2022 ते 27/03/2022

## अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील सात दिवसीय विशेष संस्कार शिबिराचे आयोजन दिनांक २१ ते २७ मार्च २०२२ या कालावधीमध्ये मौजे चांदापूर, ता सिल्लोड, जि. औरंगाबाद येथे "निरोगी राष्ट्रासाठी युवा" या ब्रीद वाक्य अंतर्गत करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन दिनांक २१ मार्च २०२२ रोजी संस्थेचे सचिव श्री अशोक देवरे यांच्या शुभहस्ते तर डॉ. दत्तात्रेय भवर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब हे उपस्थित होते. या कार्यक्रमास गावचे सरपंच संगीता चरणसिंग ठाकूर, उपसरपंच दिपाली कैलास गायकवाड, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने झाली. महाविद्यालयीन जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्यासाठी विचाराची अनमोल शिदोरी आहे ती प्रत्येक विद्यार्थ्यांनी जपून ठेवावी. जे विद्यार्थी श्रमदान शिबिरात मध्ये सहभागी असतात ते विद्यार्थी पुढे देशाचे एक जबाबदार नागरिक बनतात असे प्रतिपादन श्री अशोक देवरे यांनी उद्धाटनपर मार्गदर्शनामध्ये व शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. दत्तात्रय भवर यांनी निरोगी राष्ट्रासाठी युवा या विषयावर आपले मत व्यक्त करताना निरोगी राष्ट्रनिर्मितीसाठी युवकांनी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी केवळ योग्य आहार, योग्य विहार, योग्य आचार आणि उत्तम विचार अंगीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वेंकटेश लांब म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी याउद्देशाने या विशेष श्रमदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती मध्ये चांदापूर येथील सरपंच सौ संगीता बाई चरणसिंग ठाकूर व ग्रामसभेतील पदाधिकारी, सदस्य व गावकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अजित येळवंडे सूत्रसंचालन प्रा.मनोज पालवे, प्रास्तविक डॉ. कृष्णा नगरे यांनी माडले. या शिबिरात साधारणतः 156 मुले-मुली सहभागी झाले होते. या शिबिरातील सात दिवसाच्या काळात त्यांच्यासमोर ग्रामस्वच्छता व आरोग्य विषयक जनजागृती आधी कामांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. दररोज सकाळी सहा ते सात व्यायाम प्राणायाम व योगाने दिवसाची सुरुवात होऊन श्रमदान बौद्धिक सत्र खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी दिवसाचा शेवट होत असे.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन गावचे सरपंच सौ. संगीताबाई चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी "रक्तदान शिबीराचे" महत्व सांगुन अधिकाधिक विद्यार्थांना रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. डॉ. योगेश लक्कस यांनी या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली व विद्यार्थ्यांना निरोगी राहण्यासाठी सकस आहार व व्यायाम करण्याचा सल्ला दिला. यामध्ये रा.से.यो. स्वयमसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक व ग्रामस्थ यांनी रक्तदान व आरोग्य तपासणी करून सहभाग नोंदविला. सदर शिबीर यशस्विरित्या पार पाडण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अजित एळवंडे, प्रा.मनोज पालवे, डॉ.कृष्णा नगरे, डॉ.सुचिता देशमुख व प्रा.दिलीप अगरवाल यांनी विशेष योगदान दिले. रक्तदान शिबीराचे आयोजन इंद्रराज महाविद्यालय व दत्ताजी भाले रक्त संकलन केंद्र यांच्या संयुक्त सहभागाद्वारे करण्यात आले होते. शिबिराच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रामध्ये गावामध्ये आरोग्य विषयक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये रासेयो स्वयंसेवक व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रॅली मध्ये विद्यार्थ्यांनी आरोग्य विषयक जनजागृती करणारे फलक हाती घेऊन गावातील नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचा व आरोग्याविषयी जागृक राहण्याचे आवाहन केले. दुपारच्या सत्रात डॉ.एस.पी. जगतवाड सिद्धार्थ महाविद्यालय, जाफराबाद तसेच महाविद्यालयातील डॉ. माधव इंगळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन

करण्यात आले होते. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आपले मत व्यक्त करताना डॉ.एस.पी.जगातवाड यांनी स्वामी विवेकानंद हे युवकांचे प्रेरणा स्त्रोत होते असे प्रतिपादन केले. डॉ.माधव इंगळे यांनी योगाचे महत्त्व विशद करताना योगा आजच्या युवकांना शारीरिक व मानसिक तान तणावातून बाहेर पडण्यासाठी कसे महत्त्वाचे आहे याचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना योगा प्राप्ती प्रात्यक्षिके सुद्धा करून दाखवली. या दोन्ही सतराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर डॉ. अशोक पवार उपस्थित होते. या दिवशी सायंकाळी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते या कविसंमेलनात सिल्लोड शहर व परिसरातील कवींनी हजेरी लावली उत्तररात्रीपर्यंत रंगलेल्या कार्यक्रमास कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा दिलीप अग्रवाल यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रमेश मेंढे उपस्थित होते.

शिबिराच्या चौथ्या दिवशी डॉ रुपाली बिरादार यांनी महिलांमधील ताण तणाव व मानसिक आरोग्य तसेच डॉ सविता म्हस्के यांनी किशोरवयीन मुलींच्या आरोग्य विषयक समस्या या विषयांवर व्याख्यान दिले व महाविद्यालय मुलींनी आपली स्वतःची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ मनीषा मुगळीकर उपस्थित होत्या. तिसऱ्या सत्रामध्ये प्रा. प्रीतम मुळे यांनी ग्रामविकासात युवकांचे महत्त्व या विषयावर व्याख्यान दिले. भारताचे राष्ट्रपती डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत बनवण्याची सर्वे सर्वस्वी जबाबदारी ही आजची युवकांची आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ बी एन कावळे उपस्थित होते. शिबिराच्या पाचव्या दिवशी डॉ.अनिरुद्ध मोरे यांचे व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनाचे योगदान व प्रा. जयसिंग दिंनोरे यांचे स्वच्छता व आरोग्य ही काळाची गरज या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रमोद पाटील उपस्थित होते. सायंकाळच्या सत्रात हिवरेबाजार व राणेगणसिधी या प्रेरणादायी आदर्श ग्रामचित्रफीत दाखवण्यात आल्या. शिबिराच्या सहाव्या दिवशी डॉ. सतीश कराड यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व डॉ. जे. एस. अंभोरे यांचे वनोऔषधी वनस्पती व आरोग्य या विषयांवर व्याख्यान झाले. या सत्रामध्ये डॉ. कराड यांनी विद्यार्थ्यांना चालू घडामोडी व नोकरीच्या संधी यावर मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. संतोष चौथाइवाले उपस्थित होते. सायंकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. २१ मार्च पासून सुरू झालेल्या या शिबिराचा २७ मार्च रविवारी रोजी समारोप करण्यात आला.

या शिबिरामध्ये आरोग्यविषयक जनजागृती रॅली, आरोग्यविषयक व्याख्याने, योगासने, प्राणायाम, श्रमदान, उद्बोधन, प्रशिक्षण, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, क्षेत्रभेट, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रासेयो स्वयमसेवकांनी जनजागृती रॅलीमध्ये व्यसनमुक्ती, व्यायाम, योगा, करोना लसीकरण व अंधश्रद्धा निर्मूलन असे फलक हाती घेऊन शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्याचा संदेश दिला. या शिबिरादरम्यान रासेयो स्वयमसेवकांनी ग्रामस्थांशी संवाद साधून 100% करोना लसीकरण व मतदार नाव नोंदणी करण्याचे आवाहन केले. हे शिबीर यशस्वीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार उत्तमसिंग पवार व संस्थेचे सचिव श्री. अशोक देवरे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. शिबिराचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद शर्मा यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.योगेश लक्कस (एमडी, मेडिसिन) तसेच प्रमुख उपस्थिती मध्ये चांदापूर गावचे सरपंच सौ. संगीताबाई चरणसिंग ठाकूर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब व डॉ. चंद्रशेखर काळे तसेच रासेयो तालुका गटसमन्वयक चंद्रशेखर देवकाते उपस्थित होते. याप्रसंगी रासेयो स्वयंसेवक सागर खंडाळकर, मोहिमेश वाघमोडे, सागर काथार अश्विनी जरारे यांनी शिबिरातील आपले अनुभव कथन केले. या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून वर्षभरामध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या व सहभागी झालेल्या सर्व सेवकास प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाधिकारी म्हणून डॉ. अजित एळवंडे व मनोज पालवे तसेच सहकार्यक्रमाधिकारी म्हणून डॉ. सुचिता देशमुख प्रा. दिलीप आगरवाल व डॉ. कृष्णा नगरे यांनी काम पाहिले. या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

सदरील शिबिराचे नियोजन करण्यासाठी व यशस्वीतेसाठी प्राचार्य पी.पी. शर्मा उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. लांब डॉ. सी. एम. काळे महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल त्या सर्वांना धन्यवाद.

**डॉ. अजित येळवंडे**
**रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी**

# इंद्राज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड जि औरंगाबाद
## विशेष शिबिर 2021-22




शिबिर उद्घाटन प्रसंगी **NSS** स्वयंमसेविकानी काढलेली रांगोळी




महाविद्यालयातून **NSS** कॅम्प साठी मौजे चांदापूर येथे निघताना स्वयंमसेवक



दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करतानी मान्यवर



निरोगी राष्ट्रासाठी युवा या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. दत्तात्रय भवर



उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना आदरणीय सचिव साहेब



**NSS** गीत सादर करताना स्वयंमसेविका



क्तदान करताना प्रा. दिनोरे सर व **NSS** सहकार्यक्रमाधिकारी डॉ. नगरे सर



रक्तदान करताना गावचे सरपंच



रक्तगट व हिमोग्लोबिन चेक करताना स्वयंमसेवक



टेकडी परिसर व चांदापूर गावाची स्वच्छता करतांना स्वयंमसेवक



गावाची स्वच्छता करतांना स्वयंमसेवक



गावाची स्वच्छता करतांना स्वयंमसेवक



कविसंमेलनात कवी सादर करताना डॉ मेंढे सर



सिल्लोड : चांदापूर येथील रक्तदान शिबिराप्रसंगी उपस्थित मान्यवर.

## इंद्रराज महाविद्यालयात रक्तदान शिबीर

**सिल्लोड :** इंद्रराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने चांदापूर येथे आयोजित शिबिरात विद्यार्थ्यांचे रक्तदान व आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिराचे उदघाटन सरपंच संगीता ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. योगेश लक्कस यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. शिबीर यशस्वी करण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अजित एळवंडे, प्रा. मनोज पालवे, डॉ. कृष्णा नगरे, डॉ. सुचिता देशमुख, प्रा.दिलीप अगरवाल यांनी परिश्रम घेतले. रक्तदान शिबिरात रक्तसंकलन दत्ताजी भाले रक्त संकलन केंद्राने केले.









जेवणाचा आस्वाद घेताना स्वयंमसेवक






**शिबिर समारोप प्रसंगी आरोग्यविषयक माहिती देताना डॉक्टर योगेश लक्कस**



**स्वयंमसेवकांना प्रमाणपत्र वाटप करताना मान्यवर**




**अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. पी. पी. शर्मा**

# इंद्रराज कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड

## राष्ट्रीय सेवा योजना

### नियमित शिबिर

**आंतरराष्ट्रीय योग दिवस**

21 जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. ही कल्पना आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडली होती. ते म्हणाले, “योग ही भारताच्या प्राचीन परंपरेची अमूल्य देणगी आहे. हे मन आणि शरीराच्या ऐक्याला मूर्त रूप देते; विचार आणि कृती; संयम आणि पूर्तता; मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील सुसंवाद; आरोग्य आणि कल्याणासाठी एक समग्र दृष्टीकोन. हे व्यायामाबद्दल नाही तर स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकतेची भावना शोधण्यासाठी आहे. आपली जीवनशैली बदलून आणि चेतना निर्माण केल्याने ते आरोग्यास मदत करू शकते.” N.S.S द्वारे 7 वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. 5 जून 2021 रोजी महाविद्यालयाच्या क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभागाच्या सहकार्याने विभाग. क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. माधवसिंग इंगळे यांनी सहभागींना योगाचे विविध प्रकार दाखवले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.पी. शर्मा म्हणाले की, "योग शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे." महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सी.एम.काळे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाविषयी आपले मत व्यक्त केले आणि सांगितले की, या प्राचीन प्रथेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि योगाने जगासमोर आणलेल्या शारीरिक आणि आध्यात्मिक पराक्रमाचा उत्सव साजरा करण्यासाठी दरवर्षी २१ जून हा दिवस पाळला जातो. . हे मन आणि शरीराला आराम देण्यासाठी आणि लोकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि N.S.S. महाविद्यालयाचे स्वयंसेवक उपस्थित होते. हा कार्यक्रम कोविड-19 नियमांचे पालन करून आयोजित करण्यात आला होता.

**स्वच्छता पखवाडा**

"स्वच्छता अभियान" चा एक भाग म्हणून "स्वच्छता पखवाडा" सुरू करण्यात आला, ज्याचा उद्देश स्वच्छता-अर्थपूर्ण स्वच्छतेच्या मुद्द्यांवर आणि पद्धतींवर पंधरवड्याचा प्रखर लक्ष केंद्रित करणे आहे. GOI च्या या महान उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी आणि स्वच्छतेच्या गरजेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, N.S.S. इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड विभागाच्या वतीने 1 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2021 या कालावधीत स्वच्छता पखवाडा साजरा करताना अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. N.S.S. द्वारा स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. लोकांना स्वच्छता आणि स्वच्छतेच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी युनिट. सिल्लोडच्या आंबेडकर चौकापर्यंत स्वच्छता रॅली काढण्यात आली. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सदस्यांसह N.S.S. या रॅलीत स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आमच्या विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छ पर्यावरणाची गरज आणि महत्त्व याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. डॉ.पी.पी. शर्मा म्हणाले की, युवक ही राष्ट्राची शक्ती असून ते देशाचे भवितव्य बदलू शकतात. त्यामुळे तरुणांनी अशा सामाजिक उपक्रमात आपला सहभाग वाढवला पाहिजे.डॉ. व्ही.बी. लँब म्हणाले की, “स्वच्छता ही देवता आहे” आणि आपण आपल्या जीवनात संत गाडगेमहाराजांच्या मार्गाचे अनुसरण केले पाहिजे.

**सद्भावना दिवस**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 20 ऑगस्ट रोजी हा दिवस साजरा केला जातो. 20 ऑगस्ट 2021, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची 77 वी जयंती. सर्व धर्मातील भारतीय लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, शांतता, स्नेह आणि सांप्रदायिक सौहार्द यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस 'सद्भावना दिवस' किंवा सद्भावना दिवस म्हणून पाळला जातो. राजीव गांधी यांच्याकडे अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रकल्पांद्वारे विकसित राष्ट्राची दृष्टी होती ज्याचा त्यांनी पुढाकार घेतला. सर्व धर्म आणि भाषांच्या लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि जातीय सलोखा वाढवणे हा सद्भावना दिवसाचा मुख्य विषय आहे. N.S.S. महाविद्यालयाच्या विभागाने 20 ऑगस्ट 2021 रोजी "सद्भावना दिवस" साजरा केला. डॉ. व्ही.बी. कोकरे यांनी कै. यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. माजी पंतप्रधान राजीव गांधी. कार्यक्रमासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.ए.येळवंडे व श्री.एम.पी.पालवे यांनी परिश्रम घेतले. शेवटी उपस्थित सर्वांना सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा देण्यात आली. सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा “मी ही शपथ घेतो की मी जात, प्रांत, धर्म किंवा भाषा यांचा विचार न करता भारतातील सर्व लोकांच्या भावनिक एकतेसाठी आणि समरसतेसाठी काम करीन. मी यापुढे वचन देतो की मी हिंसाचाराचा अवलंब न करता संवाद आणि घटनात्मक मार्गाने आमच्यातील सर्व मतभेद दूर करीन.”

**राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस**

महात्मा गांधींच्या जन्मशताब्दी वर्षात (1969), 24 सप्टेंबर रोजी, 37 संस्थांमधील 40,000 विद्यार्थी स्वयंसेवकांसह राष्ट्रीय सेवा योजना (NSS) चे उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) ही भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाची केंद्रीय क्षेत्र योजना आहे. हे 11वी आणि 12वी तांत्रिक संस्थांच्या विद्यार्थ्यांना, भारतातील महाविद्यालये आणि विद्यापीठ स्तरावरील पदवीधर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विविध सरकारच्या नेतृत्वाखालील सामुदायिक सेवा उपक्रम आणि कार्यक्रमांचा भाग बनण्याची परवानगी देते. NSS चे चिन्ह जगप्रसिद्ध कोणार्क सूर्य मंदिराच्या रथ व्हीलमधून घेतले आहे. चाकातील आठ स्ट्रोक दिवसाचे २४ तास दर्शवतात जे देशाच्या सेवेसाठी चोवीस तास तत्पर राहण्याची आठवण करून देतात. लाल रंग उत्कटतेने, उर्जेने भरलेल्या तरुणांना सूचित करतो. निळा रंग एनएसएसला ब्रह्मांडाचा एक छोटासा भाग म्हणून सूचित करतो, जो मानवजातीच्या कल्याणासाठी योगदान देण्यासाठी नेहमी तयार असतो. 24 सप्टेंबर 2021 रोजी इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड येथे N.S.S. दिवस. कार्यक्रमापूर्वी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.पी.शर्मा यांनी प्रास्ताविक केले. दरवर्षी 24 सप्टेंबर रोजी भारत राष्ट्रीय सेवा योजना दिवस (NSS दिवस) साजरा करतो. डॉ.व्ही.बी. लॅम्ब आणि प्रमुख पाहुणे एन.एस.एस. क्षेत्र समन्वयक डॉ. सी. जी. देवकाते यांनी एन.एस.एस.चे महत्त्व विशद केले. आणि समाजासाठी त्याचे योगदान. N.S.S. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ.एम.जी. मुगळीकर यांनी केले तर आभार डॉ.ए.ए.येळवंडे यांनी मानले.

**माझी वसुंधरा-अभियान**

माझी वसुंधरा अभियान हा माझी वसुंधरा अंतर्गत पहिला उपक्रम आहे. हे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पर्यावरणाच्या सुधारणेसाठी निसर्गाच्या पाच घटकांच्या (पंचमहाभूते) अंतर्गत संभाव्य कृती बिंदू ओळखण्यावर लक्ष केंद्रित करते. 2 ऑक्टोबर 2020 रोजी माननीय पर्यटन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. डॉ. बी. ए. एम. विद्यापीठ औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त पत्रानुसार, एन.एस.एस. सिल्लोड येथील इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयात माझी वसुंधरा अभियान साजरा करण्यात आला. विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी त्यांच्या घरी किंवा उपलब्ध ठिकाणी वृक्षारोपण केले. त्यांनी या कार्यक्रमासाठी स्वयंसेवक म्हणून नोंदणी केली. डॉ. पी. पी. शर्मा प्राचार्य आणि महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. व्ही. बी. लॅंब यांनी सर्व सहभागींना प्रोत्साहन दिले आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वेळेवर मदत केली. N.S.S. कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. जी. मुगळीकर, डॉ. ए.ए. येळवंडे आणि श्री.एम.पी. पालवे यांनी या अभियानासाठी परिश्रम घेतले.

**आझादी का अमृत महोत्सव**

हे भारताच्या स्वातंत्र्याच्या 75 वर्षांच्या उत्सवासंदर्भात शिक्षण मंत्रालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनांच्या संदर्भात आहे- "आझादी का अमृत महोत्सव". स्वातंत्र्य दिन 2022 च्या 75 आठवडे अगोदर सुरू झालेला उत्सव 15 ऑगस्ट 2023 पर्यंत सुरू राहील. माननीय पंतप्रधानांनी 12 मार्च 2021 रोजी गुजरातमधून वर्षभर चालणाऱ्या सोहळ्याचे उद्घाटन केले, जे ऐतिहासिक सत्याग्रह सॉल्टच्या 91 व्या वर्धापनदिनानिमित्त देखील आहे. महात्मा गांधी यांनी. यापुढे सर्व शैक्षणिक संस्थांना अनेक कार्यक्रमांचे आयोजन करून "आझादी का अमृत महोत्सव" साजरा करण्याची सूचना देण्यात आली आहे. वर्षभर चालणाऱ्या उत्सवांचा भाग म्हणून कॉन्फरन्स/सेमिनार/सिम्पोजियम/निबंध स्पर्धा आणि संबंधित उपक्रम/कार्यक्रम त्यांच्या संबंधित कॅम्पसमध्ये. या प्रकाशात इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड. N.S.S विभाग. 11 ऑक्टोबर 2021 रोजी दत्तक घेतलेल्या चांदापूर गावात स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले. N.S.S. स्वयंसेवकांनी चांदापूरमधील काही महत्त्वाच्या परिसराची स्वच्छता केली. तसेच महाविद्यालयात निबंध लेखन, चित्रकला, रांगोळी पूर्ण करणे अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. N.S.S. या कार्यक्रमात स्वयंसेवक उत्साहाने सहभागी झाले होते. कार्यक्रम अधिकारी डॉ.एम.जी.मुगळीकर, डॉ.ए.ए.येळवंडे व श्री.एम.पी.पालवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. पी.पी. शर्मा यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

**मिशन युवा स्वास्थ्य" कोविड-19 लसीकरण**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय, PWD, पर्यावरण प्रदूषण आणि महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार आणि सहसंचालक उच्च शिक्षण औरंगाबाद यांच्याकडून 27 ऑक्टोबर 2022 रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार, इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिल्लोडच्या NSS युनिट विद्यार्थ्यांसाठी लसीकरण शिबिर आयोजित केले आहे. शैक्षणिक वर्ष 2021 मध्ये कोणाचा सहभाग होता. या शिबिराचे आयोजन उपजिल्हा नागरी रुग्णालय सिल्लोड आणि तेथील कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. या लसीकरण मोहिमेची माहिती विविध व्हॉट्स ॲप ग्रुपद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आली, त्यानुसार दिनांक 29 ऑक्टोबर रोजी या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ.एम.जी.मुगळीकर, डॉ.ए.ए.येळवंडे, श्री.एम.पी. पालवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. डॉ. अमित सरदेसाई, रामेश्वर फाळके, डॉ. अमृता कुलकर्णी यांसारख्या तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सिव्हिल हॉस्पिटलमधील सर्व टीम सदस्यांनी आमच्या स्वयंसेवकांना लसीकरण करून दिले आणि या लसीकरणानंतर विद्यार्थ्यांना काही काळ वेगळ्या हॉलमध्ये बसवण्यात आले. त्यांना चहा-बिस्किटांसह अल्पोपहार आणि शुद्ध पाणीही दिले जाते. सुमारे 14 विद्यार्थ्यांना पहिला डोस देण्यात आला आहे आणि 08 विद्यार्थ्यांना कोविड-19 लसीचा दुसरा डोस देण्यात आला आहे. एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. उत्तमसिंग पवार, सचिव श्री. अशोक देवरे व प्राचार्य डॉ.पी.पी.शर्मा यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या आहेत.

**सांप्रदायिक सौहार्द मोहीम सप्ताह आणि ध्वज दिन 2021**

सेक्रेटरी नॅशनल फाउंडेशन फॉर कम्युनल हार्मनी गव्हर्नमेंटने जारी केलेल्या पत्रात प्रदान केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार. भारताचे पत्र क्र. 5/1/2021-NFCH दिनांक 1 ऑक्टो. 2021. आम्ही विविध उपक्रमांद्वारे जातीय सद्भाव अभियान सप्ताह आणि ध्वज दिन 2021 साजरा केला आहे.

1. महाविद्यालयाच्या आवारात पोस्टर आणि स्टिकर्स लावणे आणि विद्यार्थ्यांच्या सूचना फलकावर प्रदर्शित करणे.
2. निधी आणि देणगी गोळा करण्यासाठी महाविद्यालयाच्या परिसरात एक छोटी रॅली काढली आणि देणगी देण्याचे आवाहन केले.
3. सांप्रदायिक सौहार्दावर जनजागृतीसाठी अतिथी व्याख्यान आयोजित करा. N.S.S. कार्यक्रम अधिकारी श्री.एम.पी. पालवे यांचे N.S.S. साठी व्याख्यान झाले. यावेळी स्वयंसेवक.
4. N.S.S मध्ये वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. सांप्रदायिक सौहार्दाचे स्वयंसेवक.

युनिट रु. 1310/- (एक हजार तीनशे दहा) विविध देणगीदारांकडून प्राप्त होतात आणि ते परिपत्रकात प्रदर्शित केलेल्या कोडवर फोन पे स्कॅनिंगद्वारे विनंती केलेल्या खात्यावर पाठवले जातात. त्याचा व्यवहार आयडी T2111251303014876937624 आहे.

**डॉ. अजित येळवंडे**
**रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी**

# इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड जि औरंगाबाद

## नियमित शिबिर 2021-22




वृक्षारोपण कार्यक्रम




वृक्षारोपण कार्यक्रम




वृक्षारोपण कार्यक्रम




आंतरराष्ट्रीय योग दिवस



आंतरराष्ट्रीय योग दिवस



आंतरराष्ट्रीय योग दिवस




राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस



राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस



माझी वसुंधरा-अभियान




माझी वसुंधरा-अभियान




आझादी का अमृत महोत्सव




आझादी का अमृत महोत्सव



मिशन युवा स्वास्थ्य" कोविड-19 लसीकरण




मिशन युवा स्वास्थ्य" कोविड-19 लसीकरण



सांप्रदायिक सौहार्द मोहीम सप्ताह




सांप्रदायिक सौहार्द मोहीम सप्ताह



सांप्रदायिक सौहार्द मोहीम सप्ताह




आंतरराष्ट्रीय एड्स दिवस


इंद्राज कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सिल्लोड. ता.सिल्लोड जि.औरंगाबाद
राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता पखवाडा

स्वच्छता पखवाडा